# समाजभानाने अर्थकारण व्हावे

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

वडाळा, ता. ४ (बातमीदार) : सामाजिक जाणिवेतून अर्थकारण करण्याची गरज असून त्यातूनच व्यवस्थेत सुधारणा करणे शक्य आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने बँकिंग सुरक्षिततेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत 'ऑटोव्हॉल्ट' स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकरची सुविधा उपलब्ध केली आहे. सोमवारी (ता. २) दादर शिवाजी पार्कमधील बुलडाणा नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या शाखेत त्याची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी उपस्थित होते.



दादर : 'ऑटोव्हॉल्ट' लॉकर सुविधेचे उद्घाटन करताना नितीन गडकरी.

"कर्ज थकवणाऱ्या प्रत्येक उद्योगपतीविरोधात कारवाई केल्यास अर्थव्यवस्था मंदावेल. त्यामुळे व्यवसाय करण्यासाठी कोणताही धोका पत्करण्यास तो तयार होणार नाही. व्यवसायातील अडचणी आणि जागतिक स्थितीकडे पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रत्येक कर्ज थकवणाऱ्याविरोधात कारवाई करू नये. सामोपचाराने घ्यावे," असे मत गडकरी यांनी व्यक्त केले. विधान परिषद सभापती रामराजे नाईक-निंबाळकर, अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व नागरी पुरवठामंत्री गिरीश बापट आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.